**<u>दिवाणी दावा क्र.२३/२०२०, कृष्णा विरुध्द विष्णु,</u>**
**<u>नि.क्र.०१ खालील आदेश,</u>**
<u>सी.एन.आर.क्र.एम.एच.पी.ए.२१-०००१२१-२०२०.</u>

प्रस्तुत प्रकरणातील वादी, प्रतिवादी आणि त्यांचे विद्वान विधिज्ञ, आज रोजीच्या लोक-अदालत समोर उपस्थित राहीले. त्यांनी लोक-अदालत समोर तडजोडीची बोलणी केली. सदर तडजोडीच्या बोलणी अनुसार त्यांनी अतिरिक्त लेखी तडजोडपत्र <u>नि.क्र.१२</u> सादर केले.

०२- सदर लेखी तडजोडपत्रातील अटी व शर्ती, तसेच त्यावरील स्वाक्ष-या/निशाणी अंगठे वादी, प्रतिवादी व त्यांच्या विधिज्ञांनी लोक-अदालत समोर मान्य व कबूल केले.

०३- उभयपक्षांमध्ये लोक-अदालत समोर सदर प्रकरण तडजोडीसाठी ठेवले असता, त्यामध्ये उभयपक्षांनी पुढाकार घेउन तडजोडीआधारे सदरील प्रकरण आपसांत सामंजस्याने मिटवले आहे. त्यांच्यामधील समजुतीच्या, तडजोडीच्या अटी व शर्ती <u>नि.क्र.१२</u> ला दाखल लेखी तडजोडपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे असल्याचे त्यांनी मान्य व कबूल केले. सबब वादी व प्रतिवादीमधील प्रस्तुतचा वाद/दावा <u>नि.क्र.१२</u> ला दाखल लेखी तडजोडपत्रातील अटी व शर्तींप्रमाणे लोक-अदालतमध्ये झालेल्या तडजोडीआधारे निकाली काढण्यात येत आहे. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

०१. तडजोडपत्र नि.क्र.१२ प्रमाणे निवाडा तयार करण्यात यावा.

०२. तडजोडपत्र नि.क्र.१२ हा नि.क्र.०१ चा भाग राहील.

०३. वादीस नियमाप्रमाणे न्यायालयीन शुल्क परत करण्यात यावे.

०४. प्रकरण तडजोडीआधारे निकाली काढण्यात येत आहे.

Digitally signed by Sachin Shivharappa Khirapate
Date: 2020.02.08 13:51:36 +0530

**(एस.एस. खिरापते)**,
लोक-अदालत पॅनल प्रमुख तथा,
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सोनपेठ.

**दिनांक :-** ०८/०२/२०२०